# अन्वा मंदिरावरील एकमेव अद्वितीय कामशिल्प

प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के,
संशोधन मार्गदर्शक तथा प्रमुख, इतिहास विभाग
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर जि. नांदेड



कामसूत्रापासून खजूराहोच्या कामशिल्पांचा इतिहास हा भारतीय संस्कृतीतील लैंगिकते सारख्या सामाजिक अविष्काराच्या निरोगीपणाचे दर्शन घडविणारा गौरवशाली कालखड मानवा लागेल. तात्कालीन साहित्य आणि शिल्पकलेत शृगाररसाला दिले गेलेले प्रधान्य पहाता तो काळ लैंगिकतेसारख्या विषयाची वैचारिक प्रगल्भता असलेला कालखंड होता, असे म्हणावे लागेल. या काळात लैंगिक विषयाकडे समाजाने निकोप दृष्टीकोणातून पाहिले पाहिजे या करीता चतुर्विध पुरुषार्थातील धर्म, अर्थ आणि काम यांना विशेष महत्त्व देण्यात आलेले दिसून येते. कारण श्री वात्सायनमुनींनी आपल्या 'कामसूत्र' या ग्रंथारंभी मोक्ष सोडून पूर्वीच्या त्रिवर्गास नमन केलेले दिसून येते. या त्रिवर्गाचे योग्य आचरण केल्यानंतरच मोक्ष प्राप्त करता येतो, अशी भावना यात अभिप्रेत होती. प्राचीन काळापासून मध्ययुगापर्यत जी कामशास्त्रीय ग्रंथाची निर्मिती झाली, याच काळात तंत्रशास्त्राचा प्रभावही भारतीय समाजजीवनावर आरुढ झालेला दिसतो. या सर्वांची परिणीती म्हणजे मंदिराच्या बाह्यंगावर निर्माण झालेली कामशिल्पे होत.

**उद्देश :—** अन्वा येथिल मंदिराच्या बाह्यंगावरील स्तंभावर निर्मिलेल्या एकमेव द्वितीय कामशिल्पाचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती :—** प्राथमिक आणि दुय्यम साधने सदरील शोधनिबंधासाठी वापरण्यात आलेली आहेत.

**लोकेशन :—** अन्वा 20° 24' 59" N ; 75° 46' 58" E

**कीवर्ड्स :—** कामशिल्प, पुरुषार्थ, लैंगिकता, संभोग, समागम, लिंग, कामेच्छा इत्यादी.

वेदांपासून पुराणापर्यंत सर्वच प्राचीन साहित्यात, 'काम' हे या सृष्टीच्या निर्मितीचे मूळ कारण आहे, असे मांडण्यात आलेले आहे. ऋग्वेदातील नासदीय सुक्तात, "कामास्तेदग्रे समवर्तताधि मनसो रेत. प्रथम तदासीत्।" (१०/१२९/४) या ऋचे नुसार विश्वारंभी या आत्म्याच्या मनात (जीवत्वाचे) उत्पन्न झालेले पहिले रेतस् (बीज) हे

कामप्रेरनेचेच होते. अर्थात 'काम' निष्काम निर्मिकाच्या मनात आरंभापासूनच अस्तित्वात होते. अशा नैसर्गिक काम प्रवृत्तीला कलात्मकरुप कामशास्त्रीय ग्रंथामधून प्रकट केलेले असून कुठलाही कागद अथवा शाई खर्ची न घालता शिल्पकलेच्या माध्यमातून समाजासमोर ठेवण्याचे कार्य शिल्पीने केलेले आहे. या मागील प्रेरणा ही तंत्रशास्त्राची असली तरी, कोरलेली 'कामशिल्पे' ही 'कामशास्त्रीय' ग्रंथातीलच आहेत. याची प्रचिती ही कामशिल्पे पाहिल्यानंतर वारंवार येते. असेच एकमेवद्वितीय असे 'कामशिल्प' अन्वा येथील मंदिराच्या बाह्यगावर पहावयास मिळते.

मराठवाड्याची औद्योगिक आणि महाराष्ट्राची पर्यटन राजधानी म्हणून ज्या शहराचा उल्लेख केला जातो ते शहर म्हणजे औरंगाबाद होय. प्रतिवर्ष हजारो पर्यटक अजिंठा आणि वेरुळ लेणी पाहण्यासाठी येत असतात. याच औरंगाबाद – अजिंठयाच्या वाटेवर ८० कि. मी. आल्यानंतर गोळेगाव नावाचे गाव लागते. गोळेगावातून उजवीकडे १० किमी अंतरावर अन्वा हे गाव असून येथे एक प्राचीन शिवमंदिर आहे. अन्वा हे गाव अजिठा पासून तीस किलोमीटर अंतरावर तर औरंगाबाद पासून इशान्य दिशेला ७५ किलोमीटर वर आहे. जगप्रसिध्द अजिंठा लेणी परिसरातील बांधीव मंदिर स्थापत्याचा अप्रतिम आविष्कार म्हणून अन्वा मंदिराचा उल्लेख करावा लागेल. शिवमंदिर हे अन्वा गावातील एक महत्वाचे आणि आकर्षक असे मंदिर आहे. मंदिर पूर्वाभिमूख असून मंदिराच्या निर्मिती संदर्भात कोणताही अभिलेखिय पुरावा उपलब्ध नाही. त्यामूळे मंदिर निर्मितीचा नेमका अचूक काळ सांगता येत नाही. मंदिर चार फुट उंचीच्या पीठावर आहे. पीठाची रचना मंदिराच्या विधानाशी सुसंगत आहे. मंदिरात एक गर्भगृह शिवाय खुला मंडप, अंतराळ अशी रचना आहे. गर्भगृह चौरसाकृती आहे.[१]

मंदिरास एकूण ५० स्तंभ आहेत. सोळा स्तंभावर मंदिराच्या मंडपाचा भार तोललेला आहे. मंडपाच्या तीन बाजूंना जी अर्धभिंत आहे त्याला लागून संलग्न असे एक कमी उंचीचे पीठ आहे. त्यावर तीस स्तंभ जोडीने उभे आहेत. मंडपाच्या भिंतीच्या अंतर्वक्र आणि बहिर्वक्र कोनावर हे स्तंभ आहेत. ही मांडणी अतिशय आकर्षक दिसते. या स्तंभाव्यतिरिक्त काही अर्धस्तंभ सुध्दा मंडपा मध्ये आहेत.[२] मंडपाच्या बाहेर बाजूने ओळीत असणाऱ्या पुर्वेकडून डाव्या बाजूने प्रदक्षिणा पथावर अंतराळाच्या बाजूने क्रमांक दोनच्या स्तंभमध्यावर एक 'कामशिल्प' कोरलेले असून त्या स्तंभाची उंची ६ फुट २ इंच आहे. या शिल्पाची वैशिष्ट्यपूर्ण शिल्पात गणना करावी लागेल. सदरील कामशिल्पाची उंची १७ सेंटीमीटर असून रुंदी २० सेंटीमीटर आहे. तर शिल्पाचा कर्ण २६ सेंटीमीटर आहे. हे शिल्प समागम अवस्थेतील असून स्त्री पुरुषाच्या लिंगासोबत मुखमैथुन करीत आहे. तर पुरुष स्त्रीस कृत्रिम लिंगाने तिची कामपूर्ती करीत आहे.

श्री वात्सायनमुनी लिखित 'कामसूत्रम्' या ग्रंथातील 'मैथुनसंयोग अधिकरण' या प्रकरणातील अध्याय ९ मध्ये 'औपरिष्ठक योग' हा प्रकार सांगितला आहे.[३] हे प्रकरण तृतीयपुरुषास

मार्गदर्शन करण्यासाठी असले तरी; त्यातील 'मुखमैथुन' हा प्रकार सर्वांसाठी उपयोगात येणारा आहे. परस्पर मुखमैथुन करुन रति क्रीडेतील आनंद मिळविता येतो. यास इंग्रजीत 69 असे म्हणतात. कारण 69 हा अंक परस्पर मुखमैथुन करणाऱ्या युगलांप्रमाणे भासतो. 'समआगमन' म्हणजे 'समागम' तसेच 'समभोग' म्हणजे 'संभोग' असे दोन शब्द कामशास्त्रीय ग्रंथात येतात. तर इंग्रजीत त्यास सेक्स किंवा इंटरकोर्स असे म्हटलेले आहे. या दोन्ही शब्दात उपरोक्त भारतीय भाषेतील अर्थबोध होत नाही. समागम ही केवळ तांत्रिक लैंगिक विधी नसून त्यात मानसिक उल्हासही अभिप्रेत आहे. समागम मनुष्याची सेंद्रिय गरज ;ठपवसवहपबंस छममकद्ध असून त्यात परस्पराला उत्तेजित करणे, आनंद देणे अपेक्षित आहे. त्याचाच एक भाग म्हणून कामशास्त्रीय ग्रंथात अनेक आसनांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. कामसूत्रम् ग्रंथातील 'औपनिषदिक' या सप्त अधि ाकरणातील द्वितीय अध्यायात पुरुष लिंगात कोणत्याही कारणास्तव शिथिलता आलेली असल्यास साम्प्रयोगिक अधिकरणात सांगितल्या प्रमाणे समागमपूर्व रति म्हणून औपरिष्टक विधी (मुखमैथुन) करुन संभोग उत्तेजना प्राप्त करावी, असे म्हटले आहे.

समागमात असंतुष्ट स्त्रीची मानसिकता स्पष्ट करतांना दामोदर गुप्त यांनी लिहलेल्या 'कुट्टनीमत' या ग्रंथातील कथन दर्शनीय आहे. त्यात म्हंटले आहे की, "त्या अपरिचिता जवळ गेल्यानंतर सारी रात्र गप्पागोष्टी आणि खाण्यापिण्यातच गेली, समागम तर नाममात्र झाले."(४) तसेच वृध्दापकाळाने रतिशक्तीशुन्य व्यक्ती सोबतचा अनुभव कथन करतांना नायिका (स्त्री) म्हणते की, "त्याची क्षणभर इच्छा कमी होत नव्हती आणि काही करण्याची त्याची शक्ती ही नव्हती."(५) हा काव्य ग्रंथ गणिकांना मार्गदर्शन करण्यासाठी रचलेला असला तरी, त्यातील ही वाक्य समागमातील स्त्री संतुष्टीच्या अनुषगाने महत्वपूर्ण आहेत. कामशास्त्रीय ग्रंथाचा अभ्यास करीत असताना एक बाब लक्षात येते की, शास्त्र यानुषंगाने चांगले आणि वाईट असे दोन्ही प्रकार मांडण्यात आलेले आहेत. या ग्रंथांमध्ये पौरुषत्व प्राप्त करण्याच्या विधी जशा सांगितलेल्या आहेत तसेच पौरुषत्व क्षीण करण्यासाठीचे प्रयोग ही सांगितलेले आहेत. या सोबतच स्त्री संतुष्टी साठी काही खास उपाय ही सांगितलेले आहेत. जसे की, श्री वात्सायनमुनी आपल्या कामसूत्र या ग्रंथात 'देशोपचार प्रकरण' यात प्रांत किंवा राज्यातील स्त्रियाच्या प्रकृतीनुरुप काही लक्षणे सांगितलेली आहेत. ज्यामध्ये स्त्रीराज्य' आणि कोशल देशातील स्त्रिया या कामेच्छा शांत करण्यासाठी कृत्रिम लिंगाचा (अपद्रव्य) उपयोग करतात.(६) रतिरहस्यात कोक्कोक यांनी स्त्री राज्य आणि कोशल प्रदेशातील स्त्रिया या स्वत. आपली कामपूर्ती करण्यासाठी कृत्रिम लिंगाचा उपयोग करतात. त्यासाठी हस्तीदंत, लोह किंवा लाकूड या पासून बनविलेले लिंग वापरतात.(७) किंवा कामेच्छा शांत न झाल्यास कृत्रिम लिंगाचा उपयोग करतात. असे म्हटले आहे. नागरसर्वस्म्(८) या कामशास्त्रीय ग्रंथात कर्नाटक राज्यातील स्त्रिया बनावटी लिंगानेच संतूष्ट होतात. स्मरदीपिका(९) नुसार कोशल देश आणि

महाराष्ट्रदेशातील स्त्रिया या कृत्रिमलिंगरमनप्रिय आहेत. त्या साठी अनेकदा रबर, लांब वांगे, केळी किंवा मुळा उपयोगात आणला जातो. हे कामशास्त्रीय ग्रथातील उल्लेख असून केवळ कामसूत्रम् या ग्रथात श्री वात्सायनमुनी यानी कृत्रिम लिंग बनवायचे कसे या विषयी सविस्तर वर्णन कलेले आहे.

त्यातही कृत्रिम लिंगाचे चूडक, एकचूडक, कचुक अथवा जालक असे प्रकार सांगितलेले आहेत. यातील जालक नावाच्या कृत्रिम लिंगावर छोटे छोटे बिंदू असावेत जेणे करुन स्त्रीस समागमाचा आनंद द्विगुणीत करण्यास उपयोग होईल असे म्हटले आहे. [१०] आज आधुनिक काळात बनविण्यात येणाऱ्या Dotted Condom प्रमाणेच प्राचीन काळात सुध्दा ही संकल्पना पहावयास मिळते. या शिवाय दुधी भोपळ्य पासून अथवा बांबू पासून कृत्रिम साधन तयार करावे व ही नलीका तेलात चागली मालीश करुन खूप गुळगुळीत बनवून कमरेस बांधावी असे म्हटलेले आहे. परंतु हा उपाय केवळ अतिकामेच्छा असणाऱ्या स्त्रीची संतुष्टी करण्यास असमर्थ असणाऱ्या पुरुषासाठी आहे [११] असे ही म्हटले आहे. कृत्रिम लिंग बनविण्यासाठी शक्यतो कथिल, शिसे या धातूचा उपयोग करावा. कारण हे धातू गुळगुळीत व थंड असून घर्षणशील असल्याने त्याचा वापर स्त्रीला सुखावह ठरतो. असे मत वात्सायनमुनींनी बाभ्रवीय आचार्यांच्या मताचा दाखला देत सांगितले आहे (१२)

**निष्कर्ष :—**

वरील विवेचनावरुन साराशरुपाने असे म्हणता येईल की, अन्वा मंदिरावर असलेल्या सदरील शिल्पातील पुरुष हा असमर्थ असावा असे वाटत नाही. कारण स्त्री त्याच्या सोबत औपरीष्टक अर्थात मुखमैथुन करीत आहे. तर पुरुषाने कृत्रिम लिंग कमरेस धारण केलेले नसून तो कृत्रिम लिंग हातात धरुन स्त्रीची कामपूर्ती करीत आहे. कदाचित राजा, सामंत, जहागिरदार तसेच गर्भश्रीमंत व्यक्ती अनेक विवाह करीत असल्याने सर्वच पत्नीची कामपूर्ती करणे शक्य नसल्याने अश्या कृत्रिम लिंगाचा उपयोगही केला जात असावा.

अन्वा मंदिरावर असलेले हे कामशिल्प महाराष्ट्रातील कोणत्याही मंदिरावर आजतागायत पाहण्यात आलेले नसून कोणार्क आणि मोढेरा येथिल मंदिरावरही असे कामशिल्प असल्याची नोंद मिळत नाही तर 'कामशिल्पाचे माहेरघर' असलेल्या खजूराहोच्या मंदिरावरही हे कामशिल्प नसल्याने ते एकमेव अद्वितीय कामशिल्प ठरावे.

**संदर्भ :—**


१. डॉ. देव प्रभाकर, ( अनु. सौ. कल्पना रायरीकर )मराठवाड्यतील प्राचीन मंदिर स्थापत्य शिल्पाविष्कार, अपरांत, पुणे, प्रथमावृत्ती २०१७, पृ. ३१ — ३२
२. कित्ता पृ. ३३
३. संपूर्ण कामसूत्र (२/९/१२—२३) अनु. दत्ता जी. कुलकर्णी, राजेश प्रकाशन,

पुणे, पृ. ८१.

४. दामोदरगुप्त, कुट्टनीमतंम्, श्लोक ३९१, त्रिपाठी तनसुखराम, अनु, कृष्णादास अकादमी, वाराणसी, १९९१.

५. कित्ता, कुट्टनीमतंम्, श्लोक ३९३.

६. संपूर्ण कामसूत्र (२/५/२७), अनु. दत्ता जी. कुलकर्णी, राजेश प्रकाशन, पुणे, पृ. ५८.

७. रतिरहस्यम् (५/१५), अनु. डॉ. श्रीरामानन्द शर्मा, कृष्णदास अकादमी, वाराणसी, १९९४, पृ. ७७–७८.

८. नागरसर्वस्म् (२०/०७), सम्पा. डॉ. रामसागर त्रिपाठी, श्रीमती तारावती त्रिपाठी, चौखम्बा संस्कृत प्रतिष्ठान, दिल्ली, २००४, पृ. ८५.

९. स्मरदीपिका (११७), सम्पा. डॉ. दलवीर सिह चौहान, चौखम्बा सस्कृत सीरीज आफिस, वाराणसी, २००४, पृ. ४९

१०. संपूर्ण कामसूत्र (७/२/१२), अनु. दत्ता जी. कुलकर्णी, राजेश प्रकाशन, पुणे, पृ. २३१

११. कित्ता (७/२/१), पृ. २३०.

१२. कित्ता (७/२/६), पृ २३०

भारतातील पश्चिमोत्तर भाग किंवा ग्रिक लेखक कतिअस याच्या मते, सिकंदराच्या आक्रमन समयी अमेजन नामक स्त्री राज्य होते जे आक्रमन न करताच जिंकले होत. हे राज्य एशिया मायनर मधील ब्लैक सी आणि एजियन सी च्या किनाऱ्यावरील प्रदेश होय.



■■■